<u>नियमित दिवाणी दावा क्र. ७२/२०२२ मधील निशाणी क्र.१०५ वरील आदेश</u>
**( गजीराम शेलार विरुध्द दशरथ धोंगडे व इतर)**

वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता अज्ञावली ६ नियम १७ प्रमाणे दाव्यामध्ये पक्षकारांना प्रतिवादीपणात सामील करणेकरीता आणि दाव्यांच्या कथनांमध्ये दुरुस्ती करण्यासाठी दाखल केला आहे.

<u>०२.</u> अर्ज व कागदपत्र पाहिले. प्रतिवादी यांनी म्हणणे सादर केले नाही. सदर प्रस्तुत अर्ज त्यांच्या म्हणणे शिवाय चालविण्यात आला. वादी यांच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

<u>०३</u> वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरुद्ध वाटपाकरीता व जाहीर घोषणेकरीता दाखल केला आहे. दावा प्रलंबित असतांना वादींना असे कळाले की प्रतिवादी क्र. १ यांनी दावा मिळकत ग.क्र. ३०१ पैकी ०हे.६९ आर व गट क्र. ३०६ पैकी ०हे.०७.५ आर क्षेत्र सौ.स्नेहल कमलेश बागरेचा यांना दि. ०६/०२/२००९ रोजी नोंदणीकृत खरेदीखताने दस्त क्र. १७९/२००९ अन्वये विकले आहे. त्यामूळे सदर दाव्यात सौ.स्नेहल कमलेश बागरेचा यांना सामिल करुन अनुषंगिक दुरुस्ती करण्याची परवानगी मिळणेकरीता वादीने विनंती केली आहे. तसेच वादीने १ड नंतर १इ मधील मजकूर, दावा कलम ९ नंतर ९अ मधील मजकूर, दावा कलम १६अ नंतर १अ ते १ई मधील मजकूर, दावा कलम १६फ नंतर १६ग मधील मजकूर, १७अ मध्ये १अ ते १क नंतर १इ मधील व १७फ नंतर नविन फफ मधील संपूर्ण मजकूर समाविष्ट करुन मिळणेकामी अर्ज केलेला आहे.

<u>०४</u> वादीने प्रस्तुत अर्जात नमूद केलेली प्रस्तावित दुरुस्ती ही दाव्यामधील वादाच्या अंतिम निराकरणाच्या दृष्टिने आवश्यक व गरजेची आहे. प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल न केल्यामूळे अर्जातील कथने त्यांना मान्य आहे असे दिसून येते. प्रस्तावित दुरुस्ती मंजुर केल्याने दाव्याचे स्वरुपात कोणताही बदल होत नाही. याउलट प्रस्तावित दुरुस्ती नामंजुर केल्यास त्याचा परीणाम अजुन एक

नविन दावा दाखल करणेस होवू शकतो. त्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजूर होणे न्यायोचित आहे. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करते:

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादींनी आज किंवा कायदेशिर मुदतीमध्ये अर्जात नमूद पक्षकारांना प्रतिवादीपणात सामील करुन तसेच अर्जात दिलेप्रमाणे प्रस्तावित दुरुस्ती करुन घ्यावी व दाव्याची दुरुस्त प्रत सादर करावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

NANAWARE MOHINI DATTATRAY
Digitally signed by NANAWARE MOHINI DATTATRAY
Date: 2026.06.11 16:29:47 +0530

स्थळः— इगतपुरी
दिनांकः— ११/०६/२०२६

( मो. द. ननवरे )
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
इगतपुरी.